महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५३

# महाराजा सयाजीराव आणि पूरनिवारण

## डॉ. राजेंद्र मगर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५३

# महाराजा सयाजीराव
# आणि
# पूरनिवारण

डॉ. राजेंद्र मगर

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि पूरनिवारण
इतिहास
डॉ. राजेंद्र मगर
●
प्रकाशन क्रमांक - ७३
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : डॉ. राजेंद्र मगर
संशोधन सहायक,
महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र
साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन,
औरंगाबाद - ९४२०३७८८५०
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २५ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.


**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीराव आणि पूरनिवारण

महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात आणि विदर्भात इ. स. २०१९-२०२० मध्ये महापुराने थैमान घातले होते. अगोदर दुष्काळ आणि नंतर महापूर या अस्मानी संकटांशी सामना करताना सर्वसामान्य जनतेला नरकयातना सोसाव्या लागत आहेत. दुष्काळापेक्षा महापुरामध्ये जीवित आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणात होत आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात आहे. प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक पातळीवरील जागरुक नागरिकांची मदत अपुरी पडत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात नुकसान होण्यासाठी नैसर्गिक संकटाची भयानकता आणि मानवी चुकाही कारणीभूत आहेत. झालेल्या नुकसानीसाठी सरकारकडून मदत देऊन या दुःखावर काही प्रमाणात फुंकर घातली जाईल. यातील किती मदत आणि दिलासा खऱ्या आपत्तीग्रस्तापर्यंत पोहोचेल याबाबत साशंकता आहे. मदत तळागाळात, शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा इतिहास आपल्याकडे जास्त समाधानकारक नाही. या

महापुराच्या पार्श्वभूमीवर शंभर वर्षांपूर्व महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोदे आणि आजूबाजूच्या जिल्ह्यात आलेल्या पुरामुळे उद्भवलेल्या गंभीर संकटाचे उत्तम व्यवस्थापन करत जनतेला दिलासा दिला होता. या संकटकाळात महाराजांनी संस्थानातील सर्व यंत्रणा कामाला लावत यावर मात केली होती.

## बचावकार्य -

सयाजीराव महाराज हे प्रजाहितदक्ष नृपती म्हणून ओळखले जातात. 'जनतेचे कल्याण हाच माझ्या जीवनाचा मोक्ष आहे.' या त्यांच्या ब्रीदवाक्यानुसार त्यांनी आयुष्यभर प्रजेची उन्नती साधण्यासाठी कष्ट घेतले. शिक्षणाचे महत्त्व जाणलेल्या या राजाने जगात कोठेही नसणाऱ्या अनेक सुधारणा संस्थानात प्रथम केल्या. प्रजेला विशेषतः शेतकरीवर्गाला त्यांनी दुष्काळ आणि अतिवृष्टीत मदत करून उभे केले. बडोद्यात इ.स. १९२७ साली जुलै महिन्यात अचानक गंभीर पूरस्थिती उद्भवली. अरबी समुद्रात आलेल्या वादळामुळे चार दिवस प्रचंड वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. संस्थानातील बडोदा आणि कडी जिल्ह्यांना या नैसर्गिक आपत्तीचा फटका बसला. या काळात चार दिवसांमध्ये बहुतांश ठिकाणी नेहमीपेक्षा जास्त पाऊस पडला. वाघोडियामध्ये ५५ इंच पावसाची नोंद झाली. एवढ्या मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यामुळे नदी-नाल्यांना महापूर आला. हे सगळे इतके अचानक घडले की, लोकांना आपला जीव वाचवण्यासाठी आपली घरेदारे, जनावरे व साधनसंपत्ती

सोडून जीव वाचवण्यासाठी पलायन करावे लागले. पूर्वी अशा संकटांची पूर्वसूचना देण्यासाठी यंत्रणा नव्हती त्यामुळे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले. या काळात थोडीफार असणारी संपर्क यंत्रणा कोलमडली. कोणत्या भागात किती नुकसान झाले याची माहिती समजायला थोडा वेळ गेला. परंतु पुराची भीषणता आणि झालेली जीवित आणि वित्तहानी पाहताच बडोद्यातील प्रशासन ताबडतोब कामाला लागले.

या महापुरातून सर्वप्रथम प्रशासनाने वेगवेगळ्या भागात अडकेल्या लोकांना सुरक्षित स्थळी हलवले. जीवितहानी कमीत कमी कशा प्रकारे होईल यासाठी उपाययोजना सुरू केल्या. लोकांबरोबर शेतकऱ्यांच्या जनावरांनाही सुरक्षित स्थळी नेले. अधिकारी आणि अधिकारी नसलेल्या लोकांनीही सर्व प्रकारच्या मदत कार्यात भाग घेतला. शहरात सर्वांनी मिळून काम केले. वर्कशॉपमध्ये तराफे तत्काळ तयार करण्यात आले. हत्ती आणि बग्गीखाने कामाला लावले. उपलब्ध असलेल्या सर्वच बोटी वापरण्यात आल्या. बाहेरून काही बोटी मागवल्या. लोकांच्या आणि जनावरांच्या जीवितानंतर प्रजेच्या मालमत्तेला प्राधान्य देण्यात आले. ती वाचवण्यात आली. स्थानिक आखाड्यातील तरुण पैलवानांनी वेळप्रसंगी स्वत:चा जीव धोक्यात घालून घरात, घरांच्या छतावर व झाडांवर अडकलेल्या लोकांचे प्राण वाचविले. काही काळासाठी जामिनावर तुरुंगाबाहेर असलेल्या कैद्यांनी या कामात खूप सहकार्य केले. सगळीकडे मदतकार्य

युद्ध पातळीवर सुरू केले. निराधार आणि बेघर लोकांना तत्काळ मदत पुरवली जात होती. बडोदा शहर आणि इतर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक इमारती आणि धर्मशाळा नागरिकांसाठी खुल्या करण्यात आल्या होत्या. अशा लोकांना मदतीसाठी सरकारतर्फे तातडीची मदत म्हणून ५०,००० रुपये मंजूर करण्यात आले. प्रशासनाच्या या सहकार्यामुळे महाभयंकर पुराच्या तुलनेत मनुष्यहानी कमी झाली.

## तातडीच्या उपाययोजना -

महापुराचे थैमान चालू असतानाच बडोद्यातील सर्व अधिकाऱ्यांनी झालेल्या नुकसानीची माहिती जमा करण्यास सुरुवात केली. आकडेवारी समोर येत गेली तशी पुराची तीव्रता लक्षात येऊ लागली. दूरध्वनी आणि वीज बंद पडल्यामुळे सर्वच माहिती येण्यात अडचणी येत होत्या. यावेळी सयाजीराव महाराज परदेशात होते. त्यांना ही बातमी समजताच त्यांनी बडोद्याशी संपर्क सुरू केला. आवश्यक असणारी सर्व मदत प्रजेला देण्याचे अधिकाऱ्यांना फर्मान सोडले. स्वतः खानगीतून लाखो रुपयांचा निधी मंजूर केला. वारंवार वेगवेगळे आदेश पाठवून सर्व प्रकारची मदत करण्याविषयी अधिकाऱ्यांना अवगत केले. मदत प्रजेपर्यंत पोहोचते की नाही हे पाहण्यासाठी तपासणी यंत्रणा कामाला लावली. याकाळात अन्नधान्य टंचाईचा फायदा घेऊन महागाई वाढण्याची भीती होती. त्यामुळे सरकारमार्फत अन्नधान्यांच्या किमतीवर निर्बंध घालण्यात आले.

थोड्याच दिवसात पूर ओसरू लागला. मात्र मागे अस्वच्छता आणि खूप घाण राहिली. शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. कारण पुरात वाहून आलेल्या प्राण्यांचे मृतदेह शेतात, रस्त्यावर व इतर अनेक ठिकाणी विखुरले होते. सगळीकडे इमारती पडून ढिगारे साचले होते. सडलेले धान्य दुकानांच्या व घरांच्या बाहेर फेकलेले होते. पाणीपुरवठा खंडित झाला होता. सगळ्या उपलब्ध संस्थांना स्वच्छतेचे व आरोग्यासंबंधी उपाययोजना करण्याचे काम देण्यात आले. महापूर ओसरल्यावर पाणीपुरवठा २४ तासांत सुरळीत करण्यात आला. तीन-चार दिवसांमध्ये जलनिस्सारण करण्यात आले. अतिशय घाण झालेले भाग स्वच्छ करण्यात आले. या उपाययोजनांमुळे शहर रोगांच्या साथीपासून आणि महामारीपासून वाचवण्यात आले. दुसऱ्या शहरांमध्ये पंचायती आणि सरकारने अशाच प्रकारचे काम केले.

महापुरासंबंधीचे प्रथम विवरण हाती लागताच महाराजांनी वाढीव आणि आश्वासक मदत करण्याचे आदेश दिले. लोकोपयोगी आणि सर्वांचे हित लक्षात घेऊन उपाययोजना आणि कार्य करण्याच्या सूचना दिल्या. नदीच्या काठावर आणि इतर ठिकाणी असलेल्या गावांचे पुनर्वसन करण्यासाठी महाराजांनी वैयक्तिक देणगी म्हणून एक लाख रुपये दिले. पुनर्वसन करताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात असे सुचवले. १) कष्टी लोकांना तत्काळ मदत करणे, २) प्रभावित क्षेत्रांमध्ये पुन्हा पेरणी करणे,

३) घरांची पुनर्बांधणी व डागडुजी करणे आणि ४) स्वच्छता आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करणे.

## पुनर्वसनासाठी मदत -

महापुरामध्ये भरून न येण्यासारखे नुकसान झाले होते. लोकांची घरे, जनावरे आणि मालमत्ता वाहून गेली होती. उभी पिके नष्ट झाली होती. यातून लोकांना उभारता यावे यासाठी त्यांना मदतीचा हात देणे जरुरीचे होते; हे महाराजांनी ओळखले. पुढील हंगामात पेरणी करण्यासाठी कमी कालावधी उपलब्ध होता. शेतकऱ्यांनी या हलाखीच्या स्थितीतून लवकरात लवकर पेरणीसाठी तयार व्हावे यासाठी तगाई (कर्ज) देण्याची व्यवस्था सरकारमार्फत करण्यात आली. त्यामध्ये ५० रुपयापर्यंतच्या कर्जावर कोणतेही व्याज घेतले जाणार नव्हते. घेतलेले कर्ज वर्षभरानंतरही फेडता येत होते. कर्ज घेण्यासाठी तारण ठेवण्याची आवश्यकता नव्हती. यापुढील विशेष म्हणजे शेतकऱ्यांचे कर्जासाठी अर्ज आल्यावर संबंधित अधिकाऱ्याने अर्जदाराच्या गावात जाऊन कर्ज देण्याचे आदेश देण्यात आले. शंभर वर्षापूर्वी शेतीच्या कर्जावर व्याज न घेण्याची योजना, तारणाची आवश्यकता नसणे, कर्ज फेडण्यासाठी वेळ मर्यादा नसणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गावात कर्ज मिळणे हे आत्ताच्या पीक कर्ज, व्याज माफी, कर्ज माफी आणि बँकांचे झिजवावे लागणारे उंबरे या किचकट प्रक्रियेच्या तुलनेत प्रभावी होते. लोकहिताचे होते.

## बियाणांसाठी मदत -

पुरामुळे बियाणे मिळणे आणि पुन्हा स्वस्त मिळणे ही एक समस्या होती. अशीच अवस्था शेतीसाठी लागणाऱ्या अवजाराबाबत होती. शेती विभागाने बियाणांचे दुकान सुरू केले. त्याचा शेतकऱ्यांना फायदा झाला. आणखी दुकाने प्रजामंडळ आणि स्थानिक समित्यांनी सुरू केली. काही दुकाने नेहमीच्या भावाने तर काही स्वस्त दरात बियाणे विक्री करत असत. त्यामुळे नफा कमी मिळत असे; परंतु हे सहन करण्यास सरकार खंबीर होते. बियाणे शेतकऱ्यांना मिळण्यासाठी आणखी एक उपययोजना आखण्यात आली. ती योजना म्हणजे बियाणे आणि रोपांच्या संयुक्त खरेदीचा उपक्रम. छन्नी गाव बडोदा जिल्ह्यात आहे. या गावात बटाटा मोठ्या प्रमाणात पिकवला जात होता. तेथे तीस हजार रुपयांची तगाई व्याजाशिवाय देण्यात आली होती. या रकमेमुळे गावकऱ्यांनी संयुक्तपणे रोपे खरेदी केली. गुणवत्ता व किमतीच्या दृष्टीने हा प्रयोग फारच यशस्वी झाला. या उपाययोजनांमुळे पिकांचे नुकसान झालेल्या संपूर्ण क्षेत्रात पुन्हा पेरणी करण्यात आली. सरकारमार्फत बियाणे आणि शेतीउपयोगी साहित्य मोफत आणि कमी किमतीत उपलब्ध करून देण्यात आले. आत्ताच्या काळातील नकली बियाणे चढ्या भावाने विकणे, बियाणांची, खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करणे आणि शेतकऱ्यांना संकटकाळात पुन्हा अडचणी निर्माण करणे या तुलनेत सयाजीराव महाराजांच्या

नैसर्गिक अडचणीच्या काळातील उपाययोजना कितीतरी सरस आणि जनहिताच्या होत्या.

## घर बांधणीला प्राधान्य -

कमी कालावधीत झालेल्या प्रचंड पावसामुळे नदीकाठच्या गावांमधील अनेक घरे वाहून गेली. ग्रामीण भागातील अनेक घरे पडली. यामुळे अनेक लोक बेघर झाले. यासंबंधीचा अहवाल येताच घरांची दुरुस्ती व पुनर्बांधकाम यासाठी मदत देण्याचे सयाजीराव महाराजांनी ठरवले. यामध्ये गरिबांसाठी मोफत निधी आणि वैयक्तिक आणि सहकारी संस्थांना कर्ज देण्यास प्राधान्य देण्यात आले. सर्व प्रकारच्या मदतीशिवाय जे गरीब लोक त्यांच्या झोपड्या दुरुस्त करू शकत नाहीत किंवा बांधूही शकत नाहीत अशा लोकांची स्थानिक समित्यांच्या मदतीने यादी तयार करण्याचे आदेश विशेष अधिकाऱ्यांना देण्यात आले. आलेल्या प्रस्तावांवर विचार करून सरकारने घर बांधणीसाठी एक योजना मंजूर केली. या अंतर्गत ६० रुपयांची मदत, शक्यतो घरबांधणीच्या साहित्याच्या स्वरूपात व काही रक्कम घर बांधणाऱ्या मजुरांच्या मजुरीसाठी देण्यात आली. इ.स. १९२७-२८ च्या बडोदा प्रशासकीय अहवालानुसार या कामासाठी सर सुभे (कलेक्टर) यांच्याकडे पुढील रकमा देण्यात आल्या. दोन लाख सरकारी निधी, पंचाहत्तर हजार रुपये दिवाणांच्या दुष्काळ निधीतून, बासष्ट हजार रुपये बडोदा आणि कडी प्रांत पंचायतींनी दिलेली रक्कम आणि सयाजीराव महाराजांनी तीन लाख सदतीस हजार

रुपये एवढी मोठी रक्कम घर बांधणीसाठी दिली. महाराजांनी संपूर्ण गावांच्या पुनर्वसनासाठी दिलेल्या रकमेपेक्षा ही रक्कम जास्त होती. या रकमा त्या-त्या भागातील अधिकाऱ्यांनी स्वतः घरांची पाहणी करून प्रत्यक्षात त्या व्यक्तीपर्यंत पोहोचाव्यात याकडे महाराजांचे लक्ष होते. या सर्व रकमा आणि नमूद केलेली सूट केवळ अतिशय गरीब लोकांसाठी होती. आर्थिक परिस्थिती बरी असणाऱ्या आणि इतर लोकांची घरेही पुरामुळे पडली होती किंवा त्यांचे नुकसान झाले होते. उधारीवर काम करूनही त्यांच्या गरजा पूर्ण होणार नव्हत्या. त्यामुळे सरकारला अशा लोकांसाठी योजना तयार करणे आवश्यक होते. यासाठी सरकारी अधिकाऱ्यांनी घरांच्या नुकसानाची पाहणी केली. विशेष अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावात जाऊन समक्ष चौकशी केली. त्या व्यक्तींच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. या सर्वांच्या आधारावर ही योजना तयार करण्यात आली. प्रशासकीय अहवालानुसार अतिवृष्टी झालेल्या दोन्ही जिल्ह्यांमध्ये १९,१८३ लोकांना २२ लाखांचे कर्ज देण्यात आले. प्रत्येक व्यक्तीला सरासरी ११५ रुपये कर्ज देण्यात आल्यामुळे असे दिसते ही योजना गरीब वर्गात फारच प्रसिद्ध झाली. १२५ रुपयांपेक्षा कमी रकमेची असल्यामुळे हे सर्व कर्ज व्याजाशिवाय देण्यात आले होते. हे कर्ज  जाती, धर्म आणि वर्ग यांचा विचार न करता सरसकट बाधित प्रजेला देण्यात येत होते. सरकारी नोकर, निवृत्तिवेतनधारक ज्यांना पन्नास रुपयांपेक्षा कमी पैसे

महिन्याकाठी मिळतात व ज्यांच्या घरांना पुरामुळे नुकसान झाले आहे; अशा लोकांसाठी सहा महिन्यांच्या पगाराएवढी रक्कम घरे पुन्हा बांधण्यासाठी अग्रीम म्हणून देण्यात आली. ही रक्कम व्याजविरहित होती. दर महिन्याला त्यांच्या पगारातील २५ टक्के रक्कम परत फेडीसाठी घेण्यात येणार होती. सर्व विभागांतील २२७ सरकारी नोकरांनी या योजनेचा लाभ घेतला व याकरिता ३६,००० रुपये खर्च करण्यात आले.

वैयक्तिक कर्जांशिवाय सहकारी गृहनिर्माण संस्थांनाही कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली. अशा संस्थांना १ लाख ६४ हजार रुपये कर्ज म्हणून देण्यात आले. याशिवाय बडोदा शहरामध्ये घरे बांधण्यासाठी विशेष योजना राबविण्यात आली. येथे अतिशय घाणेरड्या अवस्थेत झोपडपट्टीत राहणाऱ्या मागासवर्गीय लोकांना पुराचा सर्वांत जास्त फटका बसला होता. त्यामुळे त्यांच्या आरोग्याला मोठा धोका होता. आरोग्य राखण्याच्या दृष्टीने या २३ झोपडपट्ट्यांना परत चांगल्या प्रकारे तयार करण्याची योजना एका समितीमार्फत तयार केली. या योजनेअंतर्गत पाणी निचऱ्याची व्यवस्था, रस्ते, संरक्षित मार्ग, विटांच्या उंच झोपड्या बांधणे इत्यादी कामे करण्यात येणार होती. अशा झोपडपट्ट्या बांधण्यासाठी नोंद केलेल्या संस्थांसाठी ३ लाख ८२ हजार रुपयांचे कर्ज देण्यात आले. अशा प्रकारे संस्थानामधून घरांसाठी मोफत रकमा आणि कर्ज देण्याची व्यवस्था तयार झाल्यामुळे घरांसाठी लागणाऱ्या

कच्च्या मालांच्या किमतीत भरमसाट वाढ होण्याची भीती निर्माण झाली. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी फरशा आणि विटा उत्पादनात भरपूर सवलत देण्यात आली. बांधकाम साहित्याची कोठारे उघडण्यात आली. ही केंद्रे उघडण्यासाठी कर्ज देण्यात आले. ज्यामुळे पडलेली घरे कमी किमतीत लोकांना उभारता येऊ लागली. आत्ताच्या काळातील आपत्ती काळात मोठमोठ्या इमारती पडल्यामुळे अनेकांच्या जीविताला धोका उत्पन्न होणे, नवीन घरे घेत असताना बांधकाम व्यवसायातील जीवघेणी स्पर्धा, शहरांतील घरांची वाढती मागणी आणि घर बांधकाम व्यवसाय काही ठरावीक लोकांच्या हातात गेल्यामुळे घरांच्या वाढलेल्या अव्वाच्या सव्वा किमती या तुलनेत महाराजांचे घर बांधणीचे हे सर्वसमावेशक धोरण सर्वच आघाड्यांवर वरचढ ठरते.

## संपूर्ण गावाची पुनर्रचना -

या महापूरात गावेच्या गावे वाहून गेल्यामुळे नामशेष झाली. अनेक गावांचे अतोनात नुकसान झाले. अशा गावांची पुनर्रचना करण्याचे आदेश देण्यात आले. महाराज स्वतः यावर लक्ष ठेवून होते. अशी गावे पुन्हा वसवताना आदर्श रचावीत अशा सूचना देण्यात आल्या. यामध्ये महाराजांनी गाव रचनेच्या सूक्ष्म सूचना लेखी स्वरूपात दिल्या होत्या. यासाठी महाराजांनी मंजूर केलेल्या सर्व रकमा वापरण्याचे आदेश देण्यात आले. अशी माही नदीच्या काठची आठ ते दहा गावे आणि पेटलाद तालुक्यातील

एक गाव संपूर्णपणे वसविण्यात आले. यासाठी ५६,४३० रुपये खर्च करण्यात आले. यामुळे महाराजांच्या कल्पनेतील आदर्श गावे निर्माण करता आली.

## वैद्यकीय मदत -

महापुरानंतर लगेच सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला. शहरामध्ये खाजगी डॉक्टरांच्या मदतीने घरोघरी जाऊन आरोग्याविषयीचे निरीक्षण करण्याची नियमित योजना सुरुवातीचे काही आठवडे राबविण्यात आली. साहाय्यक शल्यविशारदांना संस्थानातील या कामासाठी नेमण्यात आले. क्वीनाईन हे औषध मोफत वाटण्यात आले. विहिरी व पाण्याचे इतर साठे निर्जंतुक करण्यात आले. मलेरीयाविरोधी उपाययोजना करण्यात आल्या. प्रजेला आरोग्याचे महत्त्व समजावण्यात आले. प्रजेचे हित जपणाऱ्या प्रजामंडळ समितीने मोफत क्वीनाईन वाटपासाठी सहकार्य केले. लोकांना घरोघरी आरोग्याबाबत जागरुक करण्यासाठी अनेकांनी मदत केली.

शहरांमध्ये, गावांमध्ये आरोग्य तपासणी करणे, विहिरी निर्जंतुक करणे आणि नागरिकांच्या व गावकऱ्यांच्या आरोग्यासंबंधी उद्बोधन करण्यासाठी संस्थानमार्फत वैद्यकीय अधिकाऱ्यांची पथके तयार करण्यात आली. त्यामार्फत लोकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्याच्या पुरेपूर सुविधा निर्माण करण्यात आल्या. यावेळी महाराजांनी जागतिक पातळीवर

अशा संकटानंतर कशा प्रकारे लोकांचे आरोग्य राखले जाते याचा अभ्यास केला. त्यासाठी काही तज्ज्ञ व्यक्तींना बडोद्यात बोलावले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार प्रजेच्या आरोग्याचा प्रश्न सोडविण्यात आला.

## इतर सवलती -

महापुरामुळे बाधित झालेल्या प्रजेला महाराजांनी वरील योजनांशिवाय इतरही सवलती दिल्या. त्यामध्ये रेल्वेद्वारे बांधकाम साहित्याची वाहतूक केल्यास मालवाहतूक भाड्यात सवलत देण्यात आली. बांधकाम साहित्याला शहर करातून सूट आणि कडी जिल्ह्यात लोखंडाचे पन्हाळी पत्रे आयातीवर आयात करातून सूट, संपूर्ण गावांची पुनर्रचना, वैद्यकीय मदत आणि स्वच्छतेसाठी उपाययोजना, लसीकरण, लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी दवाखाने, अशा अनेक उपयोजना करण्यात आल्या. शेतसारा वसुलीमध्ये सूट देण्यात आली. शेतसारा वसुली आणि इतर करांची वसुली थांबविण्यात आली. आपत्ती निवारणात उपयोगी पडणारे कायदे केले. त्यामुळे भविष्यात येणाऱ्या अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी उपाययोजना करणे सोपे झाले.

## अधिकाऱ्यांना प्रोत्साहन आणि कौतुक -

संस्थानात आणि संस्थानाबाहेर पूरनिवारणासाठी अथक परिश्रम करणाऱ्या आणि उदारपणे मदत कार्य करणाऱ्या अनेक समित्या होत्या. या काळात महाराजांमुळे अनेक संस्थांनी भरघोस

मदत केली.  बॉम्बे सेंट्रल रिलीफ फंडने १ लाख ७८ हजारांची घसघशीत मदत केली. बडोद्याच्या दिवाणांच्या पूरनिवारण निधीतून १ लाख ७६ हजार तर संस्थांनाबाहेरून ६३,५०० रुपयांची मदत मिळाली. ६७,१५० रुपये अमरेली जिल्ह्यातून मदतीच्या स्वरूपात प्राप्त झाले. शहराच्या दुष्काळ निवारण समितीच्या विनंतीमुळे सढळ हाताने मदत मिळाली. त्याचबरोबर सयाजीराव महाराजांची हिंदुस्थानात प्रजाहित दक्ष राजा म्हणून ओळख होती. महाराजांच्या या प्रतिमेमुळे अनेक संस्था आणि व्यक्ती मदतीला तयार झाल्या.  अनेक ठिकाणांहून धान्य, कपडे व इतर साहित्याच्या स्वरूपातही मदत प्राप्त झाली.

मदत कार्याच्या प्रत्यक्ष प्रशासनासाठी संस्थानात काम करणाऱ्या समित्यांच्या सहकार्याची खूप मदत झाली. सयाजीराव महाराजांचे राजपुत्र धैर्यशिलराव यांच्या खंबीर नेतृत्वाखाली तयार करण्यात आलेल्या समितीने व त्याच समितीअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या श्रीमंत राजस्नुषा शकुंतला यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या महिलांच्या समितीचे, प्रजामंडळाचे, विविध केंद्रांचे, स्थानिक समित्यांचे आणि संस्थानातील सर्वच महत्त्वाच्या ठिकाणी खूप काम केले.

या संकटकाळात अनेक अधिकारी आणि संस्थांनी कमालीची मदत केली. महाराज परदेशातून परत येताच या भागाचा दौरा त्यांनी काढला. प्रजेला दिलासा दिला. त्यावेळी

अधिकाऱ्यांनी केलेले कार्य त्यांच्या नजरेत भरल्यावाचून राहिले नाही. या सर्वांचे कौतुक करण्यासाठी दरबार भरविला. त्यामध्ये अनेकांना त्यांनी सन्मानित केले. या प्रसंगी केलेले महाराजांचे भाषण प्रजेची आणि अधिकाऱ्यांची काळजी घेणारे त्यांना राज्याचा प्रमुख म्हणून दिलासा देणारे होते.

## समारोप -

सयाजीराव महाराज हे दातृत्वासाठी नेहमीच तत्पर असत. सत्पात्री दान देण्यात ते नेहमीच अग्रेसर असत. हिंदुस्थानातीलच नव्हे तर जगातील अनेक गरजवंतांना त्यांनी उदारहस्ते मदत केली होती. ज्यावेळी पुत्रवत प्रेम असणारी त्यांची प्रजा संकटात असेल त्यावेळी त्यांचे दातृत्व आणि कार्य खूपच उठून दिसत असे. अशा वेळी त्यांनी हमखास खूप मोठी मदत प्रजेला केली. सयाजीराव महाराज प्रत्येक गोष्ट नियोजनपूर्वक करत. हे नियोजन करत असताना ते नेहमीच दूरदृष्टी ठेवत. त्यांचे नियोजन आणि व्यवस्थापन नेहमीच उत्कृष्ट असे. महाराज अशा प्रकारची मदत करत असताना प्रजेला परावलंबी करण्यापेक्षा स्वावलंबी करण्याकडे त्यांचा मोठा कल असे. आत्ताच्या काळातील मदत आणि महाराजांच्या मदतीत हा मूलभूत फरक आपल्या लक्षात येतो.

●●●

## संदर्भग्रंथ


१) **Baroda Administration Report, 1927-28**

२) आपटे दा.ना., 'श्री. महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र, खंड-३', प्रकाशक लेखक खुद्द, बडोदे, १९३६.

३) भांड बाबा, 'लोकपाल राजा सयाजीराव', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.

४) नेने वि.पां., 'बडोद्याचा राज्यकारभार', श्रीसयाजी साहित्यमाला, बडोदे, १९४२.

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Specthess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर,
लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com